UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
# या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक।।

## पुरवणी अंक १८ – जून २०२४ (त्रैमासिक)

● शके १९४६ ● वर्ष : ९२ ● पुरवणी अंक : १८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्रा. डॉ. प्रफुल मनोहर राजूरवाडे
- प्रा. डॉ. किशोर चौरे

✸ प्रकाशक ✸

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No. 2394-5990


10. **घटनात्मक रचना आणि दुरुस्ती प्रक्रिया : ऐतिहासिक अभ्यास**

- डॉ नितीन उल्हासराव सराफ ------------------------------------------------ 57

11. महाराष्ट्रातील ग्रामीण बेरोजगारी-एक चिकीत्सक अध्ययन

- डॉ. संजय बा. राचलवार ------------------------------------------------ 63

12. **गडचिरोली जिल्हयातील माडिया आदिवासी महिलांच्या आनंदी जीवनाचे समाजशास्त्रीय सर्वेक्षण**

- १) संजय किसन चव्हाण, २) प्रा. डॉ धनराज ए. पाटील ----------------------- 68

13. **संत शिरोमणी गुरू रविदासांचे काव्य**

- १) नितिन आनंदराव अंडेलकर, २) डॉ. मिलिंद बळीरामजी भगत ---------------- 75

14. **भारतातील संविधानवादाचे स्वरूप आणि निर्मिती**

- विजय रामकृष्ण टोकसे ------------------------------------------------ 77

15. **राळेगणसिध्दीतील शैक्षणिक विकासाचे कार्य**

- १) डॉ. मिलिंद बळीरामजी भगत, २) सावधान वासुदेव उमक -------------------- 83

16. **चंद्रपूर जिल्हयातील बौध्द मूर्तीकला व शैल्यगृहाचे (लेणी) ऐतिहासिक महत्व**

- प्रा. डॉ. प्रफुल एम. राजुरवाडे ------------------------------------------------ 86

17. **महिलांचे मुक्तीदूत – सयाजीराव महाराज गायकवाड**

- प्रा. डॉ. मनिष चव्हाण ------------------------------------------------ 90

18. **बंगाली निर्वासित लोकांमध्ये होणारे आंतरजातीय विवाह**

- डॉ. प्रदीप रामचंद्र भानसे ------------------------------------------------ 93

19. **नोकरी करणाऱ्या व नोकरी न करणाऱ्या महिलांच्या अन्नव्यस्थापनाचा तुलनात्मक अभ्यास**

- १) प्रा. डॉ. विशाखा कायंदे, २) कु. सुचिता सुरेश धाबेकर -------------------- 99

ISSN No. 2394-5990

# घटनात्मक रचना आणि दुरुस्ती प्रक्रिया : ऐतिहासिक अभ्यास

**डॉ नितीन उल्हासराव सराफ**
प्राध्यापक, इतिहास विभाग,
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, जि अमरावती.
मोबाईल : ९४२२८८१११५.

**गोषवारा :**

भारतात सुमारे १५० वर्ष ब्रिटिशांचे अधिराज्य होते. भारतीयांना स्वातंत्र्यासाठी इ.स. १८५७ च्या उठावापासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत ब्रिटिश सत्तेशी संघर्ष करावा लागला. या स्वातंत्र्यलढ्याची प्रदीर्घ परंपरा भारताला लाभलेली आहे. ब्रिटिशांच्या राजवटीत इ.स. १७७३ च्या ङ्गरेग्युलेटिंग ॲक्टफ (नियामक कायदा) पासून ते इ.स. १९३५ च्या ङ्गभारत सरकार विषयकफ कायद्यापर्यंत विविध कायदे करण्यात आले, परंतु या सर्व कायद्यांमुळे भारतीयांपेक्षा ब्रिटिश सत्तेला फायदा कसा होईल याकडेच ब्रिटिशांचे अधिक लक्ष होते, म्हणून भारतीय घटनाकारांनी लोकशाहीला महत्त्व दिले म्हणजेच घटना समितीने लोकांना डोळ्यासमोर ठेवून मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे समाविष्ट करण्यावर भर दिला होता. भारतात लोकशाही असल्याशिवाय समाजाला शोषणमुक्त करता येणार नाही म्हणून घटना समिती भारतीय जनतेच्या उन्नतीचा विचार करते. समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी निरंतर प्रयत्न करताना घटनाकार दिसतात, म्हणूनच त्यांच्या विचारांना आणि घटनेतील अनुच्छेदांना एक सुसंगत अशी तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त झाली आहे.

भारतातील दुर्बल, शोषित आणि इतर सर्व समाजाला कायद्याचे पाठबळ देऊन घटनात्मक दृष्ट्या सक्षम करणे हेच घटना समितीचे ध्येय होते असे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'घटनात्मक रचना आणि दुरुस्ती प्रक्रिया' मांडण्याकरिता अनेक प्राथमिक आणि दुय्यम साधनातून अभ्यासपूर्ण विश्लेषण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना:**

राज्यघटना ही इतिहासाची निर्मिती असते. कोणत्याही देशातील विशिष्ट प्रकारच्या ऐतिहासिक परिस्थितीतूनच त्या देशाची राज्यघटना तयार होत असते. भारतात इंग्रजी आमदानीत तयार झालेल्या विशिष्ट अशा राजकीय परिस्थितीतूनच भारतीय राज्यघटनेची निर्मिती झाल्याची दिसून येते. भारतात प्रारंभी ईस्ट इंडिया कंपनीची राजवट होती. अगदी सुरुवातीपासूनच कंपनीच्या भारतातील राज्यकारभारावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न ब्रिटिश पार्लमेंटने केलेल्या दिसून येतो. इ.स.१७७३ च्या 'रेग्युलेटिंग ॲक्ट' (नियामक कायदा) हा ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचा ब्रिटिश पार्लमेंटचा पहिला प्रयत्न होता. इ.स.१७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्ट मधील तरतुदीनुसार दर वीस वर्षांनी फेर तपासणी करण्यात यावी असे ब्रिटिश पार्लमेंटने ठरविले होते. त्यानुसार इ.स. १७९३, १८१३, १८३३ आणि १८५३ अशी एकूण चार वेळा फेर तपासणी करण्यात आली.[१]

ईस्ट इंडिया कंपनीच्या मनमानी कारभाराच्या विरुद्ध इ.स. १८५७ मध्ये भारतीय जनतेने मोठा उठाव केला. हा उठाव म्हणजे कंपनीच्या राजवटी विषयीची भारतीयांच्या मनात असलेल्या असंतोषाचा निदर्शक होता. त्यामुळे इंग्लंडच्या पार्लमेंटने कंपनीकडून सत्ता काढून घेण्यासाठी इ.स. १८५८ साली जो कायदा केला, त्या कायद्यालाच 'इ.स. १८५८ चा भारत सरकार विषयक कायदा' असे संबोधले जाते. या कायद्याने कंपनीची राजवट संपुष्टात आली आणि ब्रिटिश पार्लमेंटने सत्ता आपल्या हातात घेतली. त्यानंतर ब्रिटिश पार्लमेंट ने भारतीयांच्या मागणीला अनुसरून आणि स्वतःच्या सोयीसाठी इ.स. १८६५ पासून इ.स. १९३५ च्या भारत सरकार विषयक कायद्यापर्यंत अनेक कायदे केलेले आढळून येतात. हे ब्रिटिशांनी केलेले कायदे वरवर जरी भारतीय जनतेसाठी वाटत असले तरी या कायद्यांचा फायदा ब्रिटिश सत्तेलाच होत असे, हे सत्य नाकारता येणार नाही. ब्रिटिश पार्लमेंटने केलेल्या सर्व कायद्यातील इ.स.१९३५ चा भारत सरकार विषयक कायदा भारतात संपूर्ण उत्तरदायी सरकार स्थापण्याच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा होता. हा कायदा तपशीलवार व लांबलचक होता. त्यात ३२१ कलमे व १० परिशिष्टे होती,[२] नंतर माउंटबॅटन योजनेच्या आधारे फाळणी संबंधीचे विधेयक तयार करून ४ जुलै १९४७

रोजी ब्रिटिश पार्लमेंट पुढे ठेवण्यात आले. १८ जुलै १९४७ रोजी पार्लमेंटने विधेयकास मंजुरी दिली. या कायद्यालाच 'भारतीय स्वातंत्र्याचा कायदा' असे म्हटले जाते.[३]

इ.स. १९३४ मध्ये भारतातील साम्यवादी चळवळीचे प्रणेते आणि पुरोगामी लोकशाही वादाचे समर्थक एम. एन. रॉय यांनी पहिल्यांदा घटना समितीची संकल्पना मांडली. त्यानंतर भारतीय राज्यघटनेची निर्मिती करण्यासाठी इ.स. १९३५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने अधिकृतरित्या घटना समितीची मागणी केली. अखेर इ.स. १९४० मध्ये ब्रिटिश सरकारने ही मागणी तत्वतः मान्य केली, नंतर कॅबिनेट मिशन भारतात पाठवण्यात आले. त्यांनी ठरविलेल्या योजनेनुसार नोव्हेंबर १९४६ मध्ये घटना समितीची स्थापना करण्यात आली. या घटना समितीच्या कामकाजाला ९ डिसेंबर १९४६ रोजी सुरुवात झाली. हे कामकाज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत म्हणजेच २ वर्ष ११ महिने व १८ दिवस चालले. घटना समितीच्या कामकाजावर एकूण ६३,९६,७२९ रुपये खर्च करण्यात आला.[४]

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. तेव्हा राज्यघटना तयार झालेली नव्हती. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे घटना समितीतील मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी दिनांक ४ नोव्हेंबर १९४८ रोजी राज्यघटनेचा अंतिम मसुदा घटना समितीला सादर केला. ९ नोव्हेंबर पर्यंत म्हणजेच एकूण ५ दिवस अंतिम मुद्द्यावर घटना समितीमध्ये सर्वसाधारण चर्चा झाली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेच्या मसुद्याचा ठराव संमत करण्यात आला असे घोषित करण्यात आले आणि सदस्यांनी व अध्यक्षांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यादिवशी २८४ सदस्य उपस्थित होते. (२४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीच्या सभासदांनी स्वाक्षऱ्या केल्या) त्यांनी राज्यघटनेवर स्वाक्षऱ्या केल्या. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने, ही घटना स्वीकृत करून, अधिनियमित करून, स्वतः प्रत अर्पण करीत आहोत असे म्हटले आहे.

भारताची मूळ राज्यघटना छापील नव्हती तर ती प्रेम बिहारी नारायण रायजादा यांच्या हस्ताक्षरात आहे. त्यांनी ओघवत्या, वळणदार (इटालिक) शैलीत मूळ राज्यघटनेचे हस्तलिखित बनवले. पंडित नेहरूंनी जेव्हा त्यांना लिखाण करण्याची विनंती केली आणि या कामाच्या मोबदल्याबद्दल विचारणा केली तेव्हा प्रेम बिहारी म्हणाले, ईश्वरकृपेने माझ्याकडे सर्व काही आहे, या ऐतिहासिक कामासाठी मला काही नको, फक्त एक विनंती आहे, प्रत्येक पानावर मी माझी नाव लिहील, आणि शेवटच्या पानावर माझ्या आजोबांचे सुद्धा नाव लिहील. पंडित नेहरूंनी ही विनंती तात्काळ मान्य केली. सहा महिन्यांनी हे लिखाणाचे काम पूर्ण झाले. प्रेम बिहारी यांनी हस्तलिखित केलेल्या मूळ सरकारनाम्याला राम मनोहर सिन्हा यांनी नक्षीकाम करून आकर्षक बनविले. हिंदी भाषेतील मूळ राज्यघटनेचे हस्तलिखित वसंत कृष्णां वैद्य यांनी बनवले व नंदलाल बोस यांनी तिला उत्कृष्ट रीतीने आकर्षक बनविले.[५]

भारतीय राज्यघटनेत समाविष्ट असलेले विषय व आशय या दृष्टीने भारतीय राज्यघटना एकमेव द्वितीय आहे. जरी जगातील जवळजवळ सगळ्या लोकशाही देशांच्या राज्यघटनेतून काही भाग घेऊन राज्यघटना बनवली असली तर ही इतर देशांच्या राज्यघटनेपेक्षा वेगळी अशी भारतीय राज्यघटना असल्याची दिसून येते. अशा या भारतीय राज्यघटनेच्या घटनात्मक रचनेचे विवेचन पुढील प्रमाणे आहे.

**घटनात्मक रचना :**

इ.स. १९४६ च्या कॅबिनेट मिशन योजनेतील तरतुदीमध्ये करण्यात आलेल्या शिफारसी मध्ये भारतासाठी नवीन राज्यघटना निर्माण करण्यासाठी घटना समिती निर्माण करण्यात यावी. या घटना समितीमध्ये एकूण ३८९ सदस्य असतील त्यापैकी २९६ जागा ब्रिटिश भारतासाठी होत्या. ९३ जागा संस्थानांसाठी होत्या. ब्रिटिश भारतासाठी असलेल्या २९६ जागांपैकी २९२ जागा या गव्हर्नर असलेल्या ११ प्रांतामधून म्हणजेच मद्रास, बॉम्बे, संयुक्त प्रांत, बिहार, मध्य प्रांत, ओरिसा, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध, बंगाल व आसाम या ११ प्रांतामधून भरावयाच्या होत्या आणि प्रत्येकी १ याप्रमाणे ४ जागा मुख्य आयुक्तांच्या प्रांतामधून यामध्ये दिल्ली, अजमेर, मारवाड, कुर्ग आणि ब्रिटिश बलुचीस्थान या प्रांतांचा समावेश होता. वरील जागा यातून भरावयाच्या होत्या. ब्रिटिश प्रांतांना दिलेल्या जागा मुस्लिम शिख आणि सर्वसाधारण यातून प्रमुख समुदायांमध्ये त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दिल्या जाणार होत्या. ही निवडणूक प्रमाणशीर, प्रतिनिधित्व पद्धतीने एकल संक्रमणीय मतदान पद्धतीने होणार होती, शिवाय संस्थानांचे प्रतिनिधी संस्थानांच्या प्रमुखाने नामनिर्देशित करावयाचे होते. प्रांतिक विधिमंडळाचे मर्यादित मताधिकारावर निवडून आलेले सदस्य अप्रत्यक्षरीत्या संविधान सभेचे सदस्य निवडणार होते, कारण भारत सरकार कायदा १९३५ ने मर्यादित मताधिकार दिला होता.

भारतीय घटना समितीसाठी ब्रिटिश भारताच्या प्रांतातील २९६ जागांसाठी जुलै १९४६ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने २०८ जागा जिंकल्यानंतर मुस्लिम लीग ७३ जागांवर विजय झाले. इतर लहान गट आणि अपक्ष

उमेदवारांना उरलेल्या १५ जागा मिळाल्या, परंतु संस्थानांनी घटना समितीमध्ये सहभागी न होण्याचे ठरविल्याने त्यांना दिलेल्या ९३ जागा रिकाम्या राहिल्या. अशीही भारतीय घटना समिती जरी लोकांनी प्रौढ मताधिकार्यानुसार प्रत्यक्ष पद्धतीने निवडलेली नसली तरी घटना समितीमध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी, अँग्लो इंडियन, भारतीय ख्रिश्चन, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या घटकातील महिला या भारतीय समाजातील जवळपास सर्वच घटकातील प्रतिनिधींना स्थान होते. त्यावेळेसच्या महात्मा गांधी आणि एम. ए. जिना हे दोघे वगळले तर तत्कालीन सर्वच महत्वाच्या व्यक्ती घटना समितीच्या सदस्य होत्या.

९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीची पहिली बैठक झाली. त्या बैठकीवर मुस्लिम लीगने बहिष्कार टाकला. वेगळ्या पाकिस्तानची मागणी केली. या बैठकीला केवळ २११ सदस्य उपस्थित होते. फ्रान्सिसी प्रथेचे अनुकरण करून वयाने सर्वात मोठे असलेले सदस्य डॉ सच्चिदानंद सिन्हा यांची हंगामी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. डॉ राजेंद्र प्रसाद यांची अध्यक्ष म्हणून तर एच.सी. मुखर्जी यांची उपाध्यक्ष म्हणून दिनांक ११ डिसेंबर १९४६ रोजी निवड झाली, तर बी. एन. राव यांना सभेची घटनात्मक सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १३ डिसेंबर १९४६ रोजी 'उद्दिष्टांचा ठराव' हा ऐतिहासिक ठराव मांडला. या ठरावातून घटनात्मक संरचनेचे तत्त्वज्ञान व मुलगामी विचार व्यक्त होतात. २२ जानेवारी १९४७ रोजी 'उद्दिष्टांचा ठराव' मंजूर करण्यात आला. राज्यघटनेच्या नियमातील पुढील सर्व टप्प्यांवर या ठरावाचा प्रभाव राहिला आहे. याच ठरावाची सुधारित आवृत्ती म्हणजेच आपल्या घटनेचा सरनामा आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

सुरुवातीला घटना समितीमध्ये सहभागी न झालेले संस्थांनाचे प्रतिनिधी हळूहळू सहभागी होऊ लागले. ३ जून १९४७ रोजीच्या भारताची फाळणी करण्याच्या लॉर्ड माऊन्टबॅटन योजनेनंतर संस्थांनाचे जवळपास सर्वच प्रतिनिधी घटना समितीमध्ये सहभागी झाले होते. याशिवाय भारतीय प्रदेशातील मुस्लिम लीगचे सदस्यही घटना समितीत सहभागी झाले. या घटना समितीला सार्वभौम दर्जा देण्यात आला. घटना समिती ही भारताची संसद म्हणजेच कायदेमंडळ बनले, म्हणजे स्वतंत्र भारताची राज्यघटना सोबतच सर्वसाधारण कायदे करण्याचे अशी दोन स्वतंत्र कार्य घटना समितीवर सोपविण्यात आली. घटना समिती विधिमंडळ म्हणून पहिल्यांदा दिनांक १७ नोव्हेंबर १९४७ रोजी भरली आणि जी. व्ही. मावळकर यांची सभापती म्हणून निवड करण्यात आली. ६ अशाप्रकारे इ.स. १९५१-५२ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होऊन पहिली संसद अस्तित्वात येईपर्यंत घटना समितीने भारताची हंगामी संसद म्हणून काम केले होते. राज्यघटना तयार करण्याकरीता घटना समितीने विविध कामांसाठी काही समित्या बनवल्या होत्या. त्यापैकी ८ मुख्य समित्या होत्या तर बाकीच्या दुय्यम समित्या होत्या. त्यातील ब्रिटिश सरकारच्या ३ जून १९४७ च्या पत्रकामुळे सार्वमतानंतर वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान हे पाकिस्तानचा भाग बनल्यामुळे या भागातील वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान मधील आदिवासी क्षेत्राच्या उपसमितीला भारताच्या घटना समितीच्या वतीने कार्य करण्याची वेळ आली नाही.[७]

भारतीय घटना समितीने कामकाज करताना एकूण ११ अधिवेशने झालीत. ही अधिवेशाने ९ डिसेंबर १९४६ पासून २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत याशिवाय दिनांक २४ जानेवारी १९५० रोजी घटना समिती परत एकदा भरली. समितीतील २८४ सदस्यांनी (२९९ सदस्यांपैकी) राज्यघटनेवर स्वाक्षऱ्या केल्या. यामध्ये १५ महिला सदस्यांचा समावेश होता. या स्वाक्षऱ्या एकूण ११ पानांवर आहेत. त्यातील सर्वात शेवटची स्वाक्षरी फिरोज गांधी यांची असून त्यांनी देवनागरी व रोमन अशा दोन्ही लिपी मध्ये स्वाक्षरी केली आहे.

तत्कालीन कायदामंत्री आणि मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे घटना समितीच्या चर्चामध्ये प्रमुख सहभागी असायचे. त्यांच्या तर्कशुद्ध, जोरदार आणि दुसऱ्याला पटवून देण्याच्या युक्तिवादासाठी बाबासाहेब प्रसिद्ध होते. त्यांना यथार्थतेने भारतीय राज्यघटनेची निर्माते म्हणून ओळखले जाते. शिवाय त्यांनी कायद्याप्रती दिलेल्या योगदानाबद्दल विशेषत्वाने त्यांची ओळख आहे. म्हणूनच त्यांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' असे म्हणतात. जगातील आतापर्यंतच्या सर्व राज्यघटनांमधील भारताची राज्यघटना सर्वात मोठी आहे. इ.स. १९४९मध्ये भारतीय राज्यघटनेत सरनामा (उद्देशिका) २२ विभाग, ३९५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टे होती. इ.स. २०१६ च्या अखेरीस भारतीय राज्यघटना त्यात सरनामा, २५ विभाग. ४६५ अनुच्छेद आणि १२ परिशिष्टे आहेत. जगातील कोणत्याही राज्यघटनेत इतके अनुच्छेद व परिशिष्टे नाहीत. (उदा. अमेरिकन राज्यघटना ७ अनुच्छेद, ऑस्ट्रेलिया १२८ अनुच्छेद, चीन १३८ अनुच्छेद, कॅनडा १४७ अनुच्छेद.) भारतीय राज्यघटना अतिशय व्यापक व विस्तृत आहे, कारण भारतीय घटनेने

१. सविस्तर प्रशासकीय तरतुदी
२. अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय यांच्या समस्यांचे निराकारणाकरिता तरतुदी.

३. नागालँड, आसाम, सिक्किम, जम्मू-काश्मीर या करिता विशेष तरतुदी.

४. संघराज्य व घटक राज्यांच्या संबंधीच्या सविस्तर तरतुदी.

५. सविस्तर मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वांची तरतूद.

६. निवडणुका व आणीबाणी विषयक सविस्तर तरतुदी.

इत्यादी तरतुदींमुळे भारताची राज्यघटना विस्तृत झाली आहे. भारतीय लोकांची राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती लक्षात घेऊन घटना निर्मात्यांनी प्रत्येक गोष्ट स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे, शिवाय काळानुसार बदल करणे आवश्यक असते म्हणून घटनाकार यांनी घटनादुरुस्तीसाठी घटनेमध्ये ३६८ वे अनुच्छेद समाविष्ट करून त्यात सविस्तरपणे घटनादुरुस्तीची प्रक्रिया सांगितली असल्यामुळे भारतीय राज्यघटना व्यापक व विस्तृत झालेली आहे.

**घटना दुरुस्तीची प्रक्रिया:**

भारताची राज्यघटना बहुअंशी परिवर्तनीय व अल्पवंशी परिदृढ आहे. भारतीय राज्यघटनेच्या भाग २० मधील अनुच्छेद क्रमांक ३६८ मध्ये घटना दुरुस्तीची प्रक्रिया स्पष्ट केलेली आहे. घटना दुरुस्ती करण्याचा अधिकार भारतीय संसदेला आहे. संसद राज्यघटनेतील तरतुदींमध्ये नव्याने समावेश, बदल किंवा रद्द करून यासाठी ठरवून दिलेल्या प्रक्रियेनुसार घटना दुरुस्ती करू शकते, मात्र संसद घटनेची मूलभूत संरचना असलेल्या तरतुदींमध्ये दुरुस्ती करू शकत नाही. (केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार खटला १९७३, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय)

भारतीय घटना दुरुस्ती संबंधी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीतील समारोपीय भाषणात असे म्हटले होते की, राज्यघटनेत ज्या तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला आहे, ती तत्त्वे म्हणजे आजच्या पिढीचे विचार आहेत. दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल की ती तत्वे म्हणजे घटना समितीच्या सभासदांचे विचार आहेत. डॉ बाबासाहेबांच्या या मतावरून स्पष्ट होते की, भविष्य काळात येणाऱ्या संभाव्य समस्या, बदलणारी परिस्थिती यामध्ये संविधान अनुकूल बनावे म्हणून भारतीय राज्य घटनेत बदल किंवा दुरुस्ती करण्याची तरतूद केलेली आहे. शिवाय अनुच्छेद क्रमांक ३६८ मध्ये दुरुस्तीचे उद्देश काय असावे, दुरुस्तीचे अधिकार कोणाला, किती असावेत, घटना दुरुस्ती करताना कोणत्या मार्गाचा अवलंब करावा, घटना दुरुस्तीच्या मर्यादा काय असाव्यात यासंबंधीची सविस्तर नोंद केलेली आहे. अनुच्छेद क्रमांक ३६८ नुसार घटना दुरुस्तीची प्रक्रिया खालील प्रमाणे सांगितली जाते

**घटनादुरुस्तीचे विधेयक (विधेयक कायद्याचा कच्चा मसुदा):**

१. प्रथम संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येते, घटनादुरुस्ती विधेयक मंत्री किंवा इतर कोणताही सांसद सदस्य मांडू शकतात. त्यासाठी राष्ट्रपतीची पूर्वपरवानगीची आवश्यकता नसते.

२. घटना दुरुस्ती विधेयक प्रत्येक सभागृहाने आणि विशेष बहुमताने संमत केले पाहिजे. प्रत्येक सभागृहांनी स्वतंत्र्य रित्या विधेयक संमत केले नाही तर हे विधेयक रद्द ठरवले जाते, कारण घटना दुरुस्ती विधेयकाच्या बाबतीत संयुक्त बैठकीची तरतूद राज्यघटनेत नाही.

३. इ.स. १९७१ च्या २४ व्या घटना दुरुस्तीने, राष्ट्रपतींनी घटनादुरुस्ती विधेयकाला मान्यता देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. राष्ट्रपतींना घटना दुरुस्ती विधेयक राखून ठेवता येत नाही, शिवाय पुनर्विचारासाठी संसदेकडे परत पाठवता सुद्धा येत नाही. संसदेने मंजूर केलेल्या विधेयकावर राष्ट्रपतींना सही करावीच लागते.

याशिवाय घटनादुरुस्ती करण्याच्या तीन पद्धती अनुच्छेद ३६८ मध्ये सांगितलेल्या आहेत, त्या तीन पद्धती पुढील प्रमाणे :

**१. संसदेच्या साध्या बहुमताने घटना दुरुस्ती :**

या पद्धतीनुसार घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृह स्वतंत्रपणे मांडले जाते. प्रत्येक सभागृह उपस्थित असलेल्या सभासदांच्या बहुमताने विधेयक मंजूर केल्यानंतर व राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाल्यानंतर घटना दुरुस्ती होते. साधारणपणे पुढील विषयांच्या संदर्भात साध्या बहुमताने घटनादुरुस्ती केली जाते.

उदा. १. नवीन राज्यांची स्थापना नवीन राज्याची निर्मिती.

२. राज्यांच्या विधान परिषद निर्माण करणे किंवा रद्द करणे.

३. संसदेची गणपूर्ती

४. संसद सदस्यांची वेतन व भत्ते

५. संसदेतील प्रक्रियेचे नियम.

६. संसदेचे सदस्य व संसदेच्या समित्या यांचे विशेष अधिकार.

७. सर्वोच्च न्यायालयातील कनिष्ठ न्यायाधीशांची संख्या.

८. अधिकृत भाषेचा वापर

९. नागरिकत्व मिळवणे वा गमाविणे आणि घटक राज्याच्या सीमा बदलणे

इत्यादी वरील विषयांच्या बाबतीत घटनादुरुस्ती करावयाची असल्यास संसदेत उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सभासदांच्या साध्या बहुमतांची गरज असते.

**२. संसदेच्या विशेष बहुमताने घटना दुरुस्ती :**

संसदेचे विशेष बहुमत म्हणजे सभागृहात उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमत होय. एकूण सदस्य संख्या म्हणजे काही जागा रिक्त असतील किंवा काही कारणास्तव सदस्य अनुपस्थित असतील तरीही त्या धरून विधेयकाच्या तिसऱ्या वाचनाच्या वेळी मतदानासाठी विशेष बहुमताची आवश्यकता असते. परंतु पूर्ण काळजी घेण्याच्या उद्देशाने गृहांच्या नियमांमध्ये विधेयकाच्या सर्व महत्त्वाच्या टप्प्यांवर विशेष बहुमताची तरतूद केली आहे.[८]

त्यानुसार :

१. मूलभूत हक्क
२. राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे
३. पहिले आणि तिसऱ्या प्रकारात समाविष्ट नसलेल्या इतर सर्व तरतुदी.

वरील तरतुदीमध्ये दुरुस्ती करावयाची असल्यास संसदेच्या विशेष बहुमतानेच करावी लागते.

**३. संसदेच्या विशेष बहुमताने व अर्ध्यापेक्षा जास्त घटक राज्यांच्या संमतीने घटनादुरुस्ती :**

हा घटना दुरुस्तीचा तिसरा आणि अतिशय कठीण मार्ग आहे. या प्रकारात संसदेच्या विशेष बहुमताने मंजूर झालेल्या घटना दुरुस्ती विधेयकाला अर्ध्यापेक्षा जास्त घटक राज्यांच्या विधिमंडळाची मान्यता आवश्यक असते. (घटक राज्यांच्या विधिमंडळाचे साधे बहुमत आवश्यक असते) ज्यावेळी अर्ध्यापेक्षा जास्त घटक राज्यांनी मान्यता दिली तरच औपचारिक प्रक्रिया पूर्ण होते. मात्र अशा विधेयकाला घटक राज्यांची मान्यता देण्यासाठी कोणतीही कालमर्यादा घटनेत सांगितलेली नाही. या पद्धतीने खालील तरतुदींमध्ये दुरुस्ती करता येते.

१. राष्ट्रपतींची निवडणूक व निवडणुकीची प्रक्रिया पद्धती.
२. सर्वोच्च न्याय व उच्च न्यायालय
३. संघराज्य व घटक राज्य यांच्या वैधानिक अधिकाऱ्यांची विभागणी.
४. परिशिष्ट ७ मधील कोणतीही सूची.
५. संसदेमध्ये घटक राज्यांची प्रतिनिधित्व.
६. अनुच्छेद ३६८ मधील घटना दुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार आणि घटनादुरुस्तीची प्रक्रिया.

इत्यादी इ.स. २०१६ मध्ये याच घटनादुरुस्ती अधिनियमांव्ये घटनेच्या अनुच्छेद २६९ व नंतर २६९ - हे नवे अनुच्छेद अंतर्भूत करण्यात आले आहे. इतर देशांमध्ये घटना दुरुस्तीची एकच पद्धत सांगितली आहे, भारतात मात्र तीन पद्धती अनुच्छेद ३६८ मध्ये समाविष्ट केलेल्या दिसतात.

संविधान सभेने घटनेला अंतिम व बिनचूक असे म्हटलेले नाही, कॅनडा प्रमाणे राज्यघटनेत बदल करण्याचा जनतेचा हक्क नाकारलेला नाही तसेच अमेरिका किंवा ऑस्ट्रेलियाप्रमाणे घटना दुरुस्तीसाठी विशेष अटी व शर्ती ठेवलेल्या नाहीत, तर घटनादुरुस्तीसाठी सुलभ प्रक्रिया सांगितली आहे, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत म्हटले होते.[९]

दुरुस्ती प्रक्रिया ही राज्यघटनेतील एक वैशिष्ट्यपूर्ण व विचारपूर्वक विहित केलेली संकल्पना आहे, जरी ती गुंतागुंतीची वाटत असली तरीही ही प्रक्रिया केवळ वैविध्यपूर्ण आहे, असे ग्रँड व्हील ऑस्टिन यांनी म्हटले आहे.[१०]

**समारोप :**

संविधान राज्यघटना हा देशाचा सर्वोच्च कायदा असून त्यात राज्याच्या स्वरूपाचे वर्णन, शासनाचे अधिकार आणि निर्माण कर्त्याची भूमिका स्पष्ट केलेली असते. संविधानामुळे शासनाच्या विविध घटकांमध्ये सुसूत्रता आणण्यास मदत होते. संविधान नागरिकांच्या हक्कांवर बंधने घालणाऱ्या शासनाच्या अधिकारांवरच मर्यादा आणते. खऱ्या अर्थाने समाजाच्या इच्छा, आकांक्षांचे प्रतिबिंबच संविधानात उमटलेले दिसते.

भारतीय घटनाकारांनी भारतीय राज्यघटनेचे मूलभूत तत्वज्ञान उद्देश पत्रिकेमध्ये मोजक्या शब्दात वर्णन केलेले आहे. यावरून घटना निर्मात्यांनी भारतीय जनतेला केंद्रबिंदू मानून प्रत्येक अनुच्छेदाची निर्मिती केली, शिवाय भविष्यकाळात येणाऱ्या समस्या लक्षात घेऊन घटनाकारांनी भारतीय नागरिकांना नवीन पिढीला काळानुसार घटनादुरुस्ती करण्यासाठीचा मार्गही सांगितलेला आहे. सत्ता विभाजनाच्या तत्वानुसार कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ यांना भारतीय घटनेने समान पातळीवर ठेवलेले असले तरी घटना दुरुस्तीच्या माध्यमातून संसद सर्वश्रेष्ठ ठरविण्याचा व त्याला न्यायालयाकडून प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केलेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. पाटील, विलास व के सागर, भारतीय संविधान आणि राजकारण, के. सागर पब्लिकेशन, पुणे , २००१, पृ. ११.
२. लक्ष्मीकांत, एम., (अनुवादक श्रीकांत गोखले), इंडियन पॉलीटी, के. सागर पब्लिकेशन, पुणे , २०२०, पृ. २४.
३. पाटील बी.बी., भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०, पृ. ०९.
४. कित्ता, पृ.११.

५. लक्ष्मीकांत, एम., उपरोक्त, पृ. ३२.
६. लक्ष्मीकांत, एम., उपरोक्त, पृ. २९.
७. Rao, B. Shiva, (edited) 2021, The Framing of India's Constitution: Select Documents, Vol- III, Universal Law Publishing, Co., New Delhi, Page No. 681.
८. कश्यप, सुभाष, अवर पार्लमेंट, नॅशनल बुक ट्रस्ट पब्लिकेशन ऑफ इंडिया, दिल्ली, १९९९, पृ. १६८.
९. लक्ष्मीकांत, एम., उपरोक्त, पृ. १२५.
१०. AustAustin, Granville, The Indian Constitution : Cornerstone of a Nation, Oxford Press, Oxford, 1966, Page No. 25.

■■■